३ विभाग प्रमुखांना/प्रादेशिक प्रमुखांना महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ च्या नियम ५६ अनुसार अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करण्याबाबत अधिकारांचे प्रत्यायोजन.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक-पीएवाय १२८३/सीआर-१९१/एसईआर-७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ जानेवारी १९८५.

पहा:- [१] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-पीएवाय १२७७/सीआर-९९३/एसईआर-३, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८. → (17)

[२] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-पीएवाय १२७९/सीआर-९९३/एसईआर-३, दिनांक २९ मे १९७९. — (23)

[३] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-पीएवाय १२७९/सीआर-६०४/एसईआर-३, दिनांक १९ जुलै १९८०. (33)

शासन निर्णय:- महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ चे परिशिष्ट १ मधील नोंद अनुक्रमांक १४ अन्वये अधिकारांच्या सध्याच्या प्रत्यायोजनानुसार मंत्रालयीन प्रशासनीक विभाग, महसूली विभागाचे आयुक्त, विभाग प्रमुख आणि प्रादेशिक प्रमुख यांना त्यांच्या हाताखालील अधिकारी/कर्मचारी यांच्या बाबतीत वरील नियमामधील नियम ५६ अन्वये सदर नोंदीमधील रकाना ६ मध्ये नमूद केलेल्या काही शर्तींच्या अधिन राहून, अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकार प्रत्यायोजित करण्यात आले आहेत. विभाग प्रमुख आणि प्रादेशिक प्रमुख यांना प्रत्यायोजित केलेल्या अधिकारांची व्याप्ती वाढविणे आणि विद्यमान शर्ती शिथील करणे याबाबतचा प्रस्ताव गेले काही दिवस शासनाच्या विचाराधीन होता. शासन असा आदेश देत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ मधील नियम ५६ अन्वये खाली नमूद केलेल्या अधिका-यांच्या बाबतीत सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुख यांना प्रदान करण्यात येत आहेत:-

[१] ज्या पदाच्या वेतनश्रेणीतील किमान वेतन रु. ११०० हून कमी आहे अशा दुस-या वर्ग १ च्या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण करणारा त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील वर्ग १ चा अधिकारी, मात्र अशा अधिका-यांमध्ये अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचा समावेश असणार नाही.

[२] ज्या पदाच्या वेतनश्रेणीतील किमान वेतन रु. ११००/- हून कमी आहे अशा वर्ग १ च्या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण करणारा वर्ग २ चा अधिकारी.

२. महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ च्या नियम ५६ अनुसार विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुख यांना त्यांच्या हाताखाली काम करणा-या अराजपत्रित कर्मचा-याला वर्ग २ च्या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण करण्याबद्दल अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत./ मात्र त्या कर्मचा-याचे नाव वर्ग-२ च्या पदावरील बढतीसाठी योग्य असलेल्या अधिका-यांच्या निवडसूचीमध्ये समाविष्ट असले पाहिजे.

त्याचप्रमाणे सदर नियमान्वये महसुली विभागाचे आयुक्त हे उप जिल्हाधिका-याच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण करणा-या वर्ग-२ च्या अधिका-याला अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करु शकतात. मात्र उप जिल्हाधिका-याच्या पदावरील बढतीसाठी योग्य असलेल्या अधिका-यांच्या निवडसूचीत त्या अधिका-याचे नाव समाविष्ट असले पाहिजे. निवडसूचीमध्ये नाव समाविष्ट असले पाहिजे ह्या शर्तीबाबत आग्रह धरावा किंवा कसे या बाबतचा प्रश्न गेले काही दिवस शासनाच्या विचाराधीन होता. शासन असा आदेश देत आहे की, ही शर्त काढून टाकण्यात यावी. तथापि अतिरिक्त कार्यभार धारण करणारा कर्मचारी स्वत:ची कर्तव्ये सांभाळून दुस-या पदाची कर्तव्ये समाधानकारकरीत्या पार पाडू शकतो याबद्दल विभागीय आयुक्त/विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुख यांनी खात्री करुन घ्यावी.

३. वरील आदेश दिनांक २ जानेवारी १९८५ पासून अंमलात येतील. अशी कोणतीही प्रकरणे प्रलंबित असल्यास, ती या आदेशांप्रमाणे निकालात काढण्यात यावीत.

४. महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ - परिशिष्ट १ मधील याबाबतच्या विद्यमान तरतुदी या शासन निर्णयाच्या तरतुदीपुरत्या सुधारण्यात आल्या आहेत असे मानण्यात यावे. या परिशिष्टात यथावकाश रीतसर सुधारणा करण्यात येईल.

५. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्यं. दे. पानसे,
शासनाचे सह सचिव.

प्रति

महालेखापाल [लेखा], महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल [लेखा], महाराष्ट्र २, नागपूर,
महालेखापाल १ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल २ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
*प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त याचे कार्यालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग, एसईआर-७.

(29) (29) -49-

Delegation of powers to Heads of Departments, Regional Heads for grant of Additional Pay/ Special Pay, under Rule 56 of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department
Resolution No.PAY-1283/CR-191/SER-7
Mantralaya, Bombay 400 032, dated 2nd January 1985.

READ:- (1) Government Resolution, Finance Department, No.PAY-1277/CR-993/SER-3, dated 16th November 1978.

(2) Government Resolution, Finance Department, No.PAY-1279/CR-993/SER-3, dated 29th May 1979.

(3) Government Resolution, Finance Department, No.PAY-1279/CR-604/SER-3, dated 19th July 1980.

RESOLUTION:- Under the existing delegation of powers vide entry at Sr.No.14 in Appendix-I in the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981, the Administrative Departments of Mantralaya, the Revenue Commissioners of the Divisions, the Heads of Departments and the Regional Heads have been delegated powers to sanction additional pay/special pay under Rule 56 of the said rules to the officers/staff members under them, subject to certain conditions mentioned in Column 6 of the said entry. The question of enhancing the scope of powers in respect of Heads of Departments and Regional Heads and liberalising the existing conditions was under consideration of Government for some time past. Government is pleased to direct that the Heads of Departments/Regional Heads should be empowered to sanction additional pay/special pay for a period of six months under Rule 56 of Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 to

(i) a Class-I Officer under their Administrative control, excluding officers belonging to All India Services, for holding additional charge of another Class-I post, the minimum of the pay scale of which is below Rs.1100/-.

(ii) a Class-II officer for holding additional charge of a Class-I post, the minimum of the pay scale of which is below Rs.1100/-.

2. The Heads of Departments/Regional Heads have been delegated the power to sanction additional pay/special pay under Rule 56 of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 to a non-gazetted member of the staff working under them for holding additional charge of a Class-II post provided his name is included in the select list of officers fit for promotion to a Class-II post. Similarly, the Commissioner of Revenue Division can sanction additional pay/special pay under the said rule to a Class-II officer for holding charge of Deputy Collector's post provided his name is included in the select list of officers fit for promotion to the post of Deputy Collector. The question whether the condition of inclusion of the name in the select list should be insisted upon was under consideration of

Government for some time past. Government is pleased to direct that this condition should be dispensed with. However, the Commissioners of Divisions/the Heads of Departments/Regional Heads should ensure that the person entrusted with additional charge is in a position to discharge the duties of the second post in addition to his own duties, satisfactorily.

3. These orders shall take effect from the 2nd January 1985. The pending cases, if any, should be decided according to these orders.

4. The existing provisions in Appendix-I of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981, in this respect should be deemed to have been amended to the extent of the provision of this Resolution. A formal amendment to the Appendix will be made in due course.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. D. PANSE,
Joint Secretary to Government.

दिनांक 29 . 3 . 85

बारनिशी लिपिक,

[illegible]